# पालखी

पालखी—— चाले हळु डोलते
भक्तगण—— सिंधुपरी गर्जते ॥१॥
काहि ते—— लेजिम खुळ हलविती
अन्य ते—— मशालिते उजळिती ॥२॥
वाजती—— नाद; फटाके कुठे
दणकती—— बार; बंदुका तिथे ॥३॥
घोष हा—— हरिनामाचा उडे
नौबती—— उच्च नगारा झडे ॥४॥
गुंगले—— वारकरी भक्तिने
भान ना;—— काय कुठे सक्तिने ? ॥५॥
ओढिती—— पालखीस; धन्य ते
मुक्तऋण—— पोहचले धन्यतें ॥६॥
विकारा—— वासनांस सर्वही
ठेविल्या—— गुंडाळुनि स्वगृही ॥७॥
स्वार्थ ना—— केवळ परमार्थ हा
भक्तिचा—— अगाध महिमा पहा ॥८॥
विसरले—— शरीरास आपुल्या
दाविती—— नश्वरते वाकुल्या ॥९॥
आतली—— मूर्त कुणाची बरे
ना मुळी—— महत्त्व त्याला खरे ॥१०॥
विठ्ठला—— कृष्णा वा शंकरा
बैसवा—— केवळ की पत्थरा ॥११॥
भावना—— हीच सुनिष्ठा खरी
भक्तिचा—— दीप हवा अंतरी ॥१२॥
दाखवा—— भावजला वाचुनी
भक्तिचे—— कारंजे उडवुनी ॥१३॥
नाशवंत—— शरीर जरि भासले
शाश्वतचि—— भक्तरूपि राहिले ॥१४॥
नाद हा—— घुमविल ही पालखी
श्रांत ना—— चालतसे सारखी ॥१५॥